स्थापना: जुन १९६४



“ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार”

- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संस्थेचे

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त)

२१३० ई-वॉर्ड, ताराबाई पार्क, ता. करवीर, जिल्हा. कोल्हापूर ४१६००३

यु.जी.सी 2(f) & 12(B) मान्यताप्राप्त

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र) संलग्नित

संकेतस्थळ: www.vivekanandcollege.ac.in ई-मेल: info@vivekanandcollege.org

**परीक्षा विभाग**

**शैक्षणिक वर्ष 2024 - 25**

---

दि. 14 / 08 / 2024

## शैक्षणिक वर्ष 2024–25 मध्ये तृतीय वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सूचना

विषयः मेकअप जुलै 2024 च्या परीक्षेमध्ये उनुत्तीर्ण विद्‌यार्थ्यांना पुढील वर्षामध्ये प्रवेशासंदर्भात विशेष संधी देण्याबाबत...

अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाच्या विद्या परिषदेमधील निर्णयानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मेकअप जुलै 2024 च्या कला, वाणिज्य, विज्ञान व व्यावसायिक परीक्षेत अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील वर्गामध्ये विशेष प्रवेश संधी देण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आले आहेत.

1) सर्व विद्याशाखेतील तीन वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थी जे माहे जुलै, 2024 च्या परीक्षेत प्रथम वर्ष (सत्र 1 व 2) किंवा व्दितीय वर्ष (सत्र 3 व 4) मध्ये अनुत्तीर्ण असल्याकारणाने त्यांना तृतीय वर्षात प्रवेश घेण्यास बाधा येत असेल तर सदर विद्यार्थी कॅरी ऑन (Carry on) संधी अंतर्गत तृतीय वर्षास प्रवेशास पात्र राहील.

2) प्रथम वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना तृतीय वर्षाकरिता किंवा व्दितीय वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना तृतीय वर्षाकरिता तात्पुरता प्रवेश काही अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यात येत आहे. त्याबाबतचे विहीत हमीपत्र प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांने महाविद्यालयाच्या प्रवेश समितीकडे सादर करणे अनिवार्य असेल.

3) तृतीय वर्षाच्या पाचव्या सत्रामध्ये तात्पुरता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक बाबी जसे अध्ययन, प्रात्यक्षिके, सत्रकर्म व इतर बाबी विभागाने नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे पूर्ण करुन घ्याव्यात. त्याबाबत परीक्षा व इतर बाबी या ऑक्टोबर 2024 व मार्च 2025 च्या परीक्षांमध्ये अनुत्तीर्ण विषय पूर्णतः उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे.

4) जे तात्पुरते प्रवेशित विद्यार्थी ऑक्टोबर 2024 व मार्च 2025च्या परीक्षांमध्ये प्रथम, व्दितीय वर्षाचे अनुशेष पूर्ण करु शकणार नाहीत अशा विद्यार्थ्यांचा निकाल राखिव ठेवण्यात येईल. तसेच संबंधित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसान झाल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

प्राचार्य

प्राचार्य
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)